# प्रेसनोट दि. २६/११/२०१७

## मौजमजेसाठी घरफोडी चोरी करणारे अटकेत

## साडेपाच लाखांचा मुददेमाल जप्त

दि. १२/११/२०१७ रोजी सायं. ७.४५ वा. ते सायं. ८.३० वा. दरम्यान फिर्यादी सागर विजय कुलकर्णी वय ४२ वर्ष, धंदा कॉन्ट्रॅक्टर, रा. ७५९ सदाशिव रोड, कुमठेकर रोड, भास्कर अपार्ट. फ्लॅट नंबर १, पुणे हे त्यांचे कुटुंबासह बाहेर फिरायला गेले असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचा दरवाजाचा कडी कोयंडा तोडून आत प्रवेश करून आतील लाकडी कपाटातील चाव्यांनी इतर कपाटे उघडून त्यामधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ७६,०००/- रू. किंचा ऐवज घरफोडी चोरी करून नेलेबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने विश्रामबाग पोलीस ठाणे ५००/२०१७ भांदविक ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा तपास विश्रामबाग पोलीस ठाणे कडील पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील व त्यांचे तपास पथक तपास करीत असताना सदर घटनास्थळाचे परीसरातून माहिती काढून रिक्षाचालक रिझवान निजामुददीन अन्सारी वय २६ वर्षे रा. शिवराय नगर, बिलाल मशीदजवळ, स. नं. ६५८ बिबवेवाडी, पुणे याने त्याचे ॲटोरिक्षामध्ये आरोपी नामे १. राजू शंभू देवनाथ वय १९ वर्षे रा. ६३५ हिंगूरेवाडा, शाहू चौक, शुक्रवार पेठ, पुणे २. अक्षय लक्ष्मण साळुंके वय ३४ वर्षे रा. सदर यांचेसह जावून सदरची घरफोडी चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करून त्यांचेकडे केले तपासात त्यांनी वेगवेगळया ठिकाणी घरफोडी चोरी करून त्यामध्ये मिळालेला माल हा त्याचे ओळखीचे महिलेमार्फत विल्हेवाट लावून त्यातून मिळालेले पैसे मौजमजेसाठी वापरले आहेत.

सदर आरोपीतांकडे तपास करता त्यांनी ५ घरफोडी चोरीचे व ३ इतर चोरीचे असे एकुण ८ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्यांचेकडून १२८ ग्रॅम वजनाचे सोन्यचे दागिने व इतर वस्तू असा ५,०९,८५०/- रू. चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

तसेच तुळशीबाग मंडई परीसरात गर्दीचा फायदा घेवून चोरी करणारे १. वसंत विजय जाधव वय ३३ वर्षे रा. सर्वोदय कॉलनी, पुणे २. नितीन शंकर जाधव वय २० वर्षे रा. शाहू महाराज शाळे मागे, सर्वोदय कॉलनी, पुणे ३. शक्ति दत्तात्रय जाधव वय ३० वर्षे रा. सर्वोदय कॉलनी, पुणे हे तुळशीबाग परीसरात गर्दीचा फायदा घेवून पर्स चोरी करणेकरीता फिरत असताना मिळून आल्याने त्यांना अटक करून त्यांचेकडून ४ चोरीचे गुन्हे उघडकीस आणून त्यांचेकडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ४२,०००/- रूपये चा ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे.

विश्रामबाग पोलीस ठाणे कडील पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील व त्यांचे तपास पथकाने एकुण ७ आरोपी अटक करून त्यांचेकडून १३५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, इतर वस्तू व रोख रक्कम असा ५,५१,८५०/- रू. चा माल हस्तगत करून एकुण १२ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

वरील कामगिरी अपर पोलीस आयुक्त रविंद्र सेनगावकर, परिमंडळ १ चे पोलीस उप-आयुक्त बसवराज तेली, सहा. पोलीस आयुक्त शरद उगले यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अप्पासाहेब शेवाळे, पोलीस निरीक्षक गुन्हे अमृत मराठे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई, संजय बनसोडे, चेतन शिरोळकर, धीरज पवार, रेखा बनकर यांनी केली आहे.